Add

(2)

क्रमांक: पीओअेस-१०८८/१४६/स्वासैकक्ष,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६.४.१९९०.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा निवडमंडळ व प्रादेशिक दुय्यम सेवा निवडमंडळे - सुधारणा करण्याबाबत - स्वातंत्र्य सैनिक.

महोदय,

वर नमूद केलेल्या विषयाबाबतच्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-प्रानिमं-२४८९/प्र.क्र. २२३/८९/१३-अ, दिनांक २० फेब्रुवारी १९९० कडे आपले लक्ष वेधण्यांत येते.

२. शासन परिपत्रक, ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०६५/४६५२/जे, दिनांक १२ ऑक्टोबर १९६५ अन्वये स्वातंत्र्य सैनिक तसेच त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींना वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांमध्ये नेमणूका देण्यासाठी अन्यथा पात्र असल्यास प्राधान्य देण्यात आलेले आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-प्रानिमं-२४८९/प्र.क्र. २२३/८९/१३-अ, दिनांक २० फेब्रुवारी १९९० अन्वये स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींना द्यावयाच्या नेमणूका निवडमंडळाच्या कक्षेतून वगळण्यात आलेल्या आहेत. यापुढे स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींना त्या संबंधात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून नेमणूक अधिका-यांनी परस्पर नेमणूका करावयाच्या आहेत. तेव्हा आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या निदर्शनास हे आदेश आणून योग्य ती कार्यवाही जातीने लक्ष घालून करण्याबाबतच्या सूचना त्यांना देण्यात याव्यात.

-9 APR 1990

आपली,
स्मिशरानडे
(स्मिशरानडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी.

१] सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई,
२] सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई.

व. ६४९०.